जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५३३ दिनांक - ११/०७/२०२३**

**भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन पुणे शहर**

# परराज्यामध्ये डान्स कार्यक्रम करण्याकरता गेलेल्या तरुणीच्या घरामध्ये घरफोडी करणा-या चोरटयाकडुन सोन्याचे दागिने,रोख रक्कम व महागडा मोबाईल हस्तगत भारती विद्यापीठ पोलीसांची कौशल्यपुर्ण कामगिरी

दिनांक २६/०६/२०२३ रोजी ते दिनांक ०९/०७/२०२३ रोजीचे पहाटे ०५/३० वा.दरम्यान फिर्यादी हे लग्नामध्ये डान्सचे कार्यक्रमा करीता गुजरात येथे गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे घराचे मुख्य दरवाज्याचे लॉक कशाचे तरी सहाय्याने उघडुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील कपाटाचे लॉकर तोडुन त्यामधुन ५,६०,०००/- रुपये किंमतीचे १० तोळे वजनाचे सोन्याच्या अंगठया,चैन,तसेच ७,५०,०००/- रुपये रोख असा एकुण १३,१०,०००/- रुपये किंमतीचा माल लबाडीच्या इरादयाने चोरी केला आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४५४/२०२३, भांदवि कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार शोध घेत असताना पोलीस अंमलदार **राहुल तांबे,विक्रम सावंत** यांना त्यांचे बातमीदारामार्फेत बातमी मिळाली की,सदरचा गुन्हा हा इसम नामे **शुभम अशोक माने,वय २३ वर्षे,रा.फ्लॅट नंबर ४१०,सुदरतिर्थ अपार्टमेंन्ट,मांगडेवाडी,कात्रज,पुणे** याने केला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर आरोपीतांचा शोध घेवुन त्यास अटक केली आहे. तपास करता त्याचेकडुन गुन्हयातील एकुण **१२,२२,०००/-** रुपंयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजय कुंभार,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजय पुराणिक,गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ,पोलीस अंमलदार राहुल तांबे,विक्रम सावंत,सचिन सरपाले,आशिष गायकवाड, शैलेश साठे,चेतन गोरे,निलेश ढमढेरे,मंगेश पवार,हर्षल शिंदे,अभिजीत जाधव,अवधतु जमदाडे,धनाजी धोत्रे, सचिन गाडे अभिनय चौधरी यांच्या पथकाने केली आहे.


भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर